आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१६ सप्टेंबर २०२४ - सोमवार

**ठळक बातम्या**

- हरित ऊर्जेच्या क्षेत्रात जगाचं नेतृत्व करण्यासाठी भारत सज्ज असल्याचं प्रधानमंत्र्यांचं नवीकरणीय उर्जा क्षेत्रातल्या गुंतवणूकदार परिषदेत प्रतिपादन
- राज्यातल्या ३ वंदे भारत रेल्वेगाड्यांना प्रधानमंत्र्यांनी दूरस्थ पद्धतीनं दाखवला हिरवा झेंडा
- धनगर समाजाचा समावेश आदिवासींमध्ये करणं चुकीचं असल्याची विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांची भूमिका
- राज्यभरात उद्या, अनंत चतुर्दशीच्या पार्श्वभूमीवर गणेश विसर्जनासाठी प्रशासन सज्ज

**आणि**

- आशिया हॉकी स्पर्धेत दक्षिण कोरियाचा पराभव करत भारतीय संघाची अंतिम फेरीत धडक

**<><><><><>**

हरित ऊर्जेच्या क्षेत्रात जगाचं नेतृत्व करण्यासाठी भारत सज्ज असून याचाच भाग म्हणून सरकारनं २० हजार कोटी रुपयांच्या ग्रीन हायड्रोजन मिशनला सुरुवात केली आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. ते आज गुजरातमधे गांधीनगर इथं आयोजित चौथ्या जागतिक नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रातल्या गुंतवणूकदारांच्या परिषदेत बोलत होते. केंद्रीय नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाने या परिषदेचं आयोजन केलं आहे. या परिषदेला संबोधित करताना प्रधानमंत्र्यांनी भारताने ऊर्जा क्षेत्रात केलेल्या प्रगतीचा आढावा घेतला. ते म्हणाले....

**बाईट- प्रधानमंत्री (३० सेकंद)**

भारतानं हरित ऊर्जा क्षेत्रात प्रगती साधण्यासाठी अनेक महत्वाचे निर्णय घेतले आहेत. ३१ हजार मेगावॅट जलविद्युत निर्मितीच्या प्रकल्पाचं काम सुरू असून यासाठी १२ हजार कोटी रुपये खर्च येणार असल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. यावेळी त्यांनी पीएम सूर्यघर योजनेच्या यशाबद्दल कौतुक केलं. आतापर्यंत देशभरातल्या सव्वा तीन लाख घरांमध्ये सौर पॅनल बसवण्यात आले आहेत. २१ व्या शतकाचा इतिहास लिहिला जाईल तेव्हा भारताच्या सौर क्रांतीचा इतिहास सुवर्ण अक्षरांनी लिहिला जाईल, असं ते म्हणाले.

या परिषदेला गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू आदी उपस्थित होते.

३ दिवस चालणाऱ्या या परिषदेत महाराष्ट्रासह देशातली अनेक राज्यं सादरीकरण करणार आहेत. तसंच देशोदेशीहून मोठ्या संख्येनं प्रतिनिधी परिषदेत सहभागी होत आहेत.

**या परिषदेनंतर** मोदी यांनी अहमदाबाद ते गांधीनगर या मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्याला हिरवा झेंडा दाखवला. तसंच अहमदाबाद ते भुज या वंदे भारत मेट्रोसह ८ हजार कोटी रुपयांच्या प्रकल्पांची पायाभरणी केली. अहमदाबाद ते भुज ही देशातली पहिली वंदे भारत मेट्रो आहे. सध्याचा काळ हा भारतासाठी सुवर्णकाळ असून पुढच्या २५ वर्षांत भारताचा समावेश विकसित देशांमध्ये होईल, असा विश्वास मोदी यांनी यावेळी झालेल्या कार्यक्रमात व्यक्त केला.

**प्रधानमंत्र्यांनी आज सहा वंदे भारत** रेल्वेगाड्यांना दूरदृश्य प्रणालीद्वारे हिरवा झेंडा दाखवला. यात राज्यातल्या नागपूर ते सिकंदराबाद, कोल्हापूर ते पुणे आणि पुणे ते हुबळी यांच्यासह, छत्तीसगडमधल्या दुर्ग ते विशाखापट्टणम, तसंच आग्रा ते वाराणसी आणि वाराणसी ते दिल्ली या रेल्वेगाड्यांचा समावेश आहे. याशिवाय मोदी यांनी

प्रधानमंत्री ग्रामीण आवाज योजने अंतर्गत तीस हजार घरांना मंजुरी दिली. तसंच यासाठीचा पहिला हफ्ता जारी केला.

<><><><><>

धनगरांचा समावेश आदिवासी जमातीमध्ये करणं चुकीचं असून त्याला संपूर्ण आदिवासी समाजाचा विरोध कायम असेल. असं राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार आणि विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांनी म्हटलं आहे. ते आज नाशिक इथं बातमीदारांशी बोलत होते.

धनगर जातीचा आदिवासी जमातीमध्ये समावेश करण्यासाठी लवकरच जीआर काढण्याकरता एक समिती स्थापन करण्याचा निर्णय नुकताच मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी आयोजित धनगर समाजाच्या नेत्यांची बैठकीत झाला. मुख्यमंत्र्यांनी किमान आमच्या खात्याच्या मंत्र्यांना किंवा राज्यातल्या दोन वरिष्ठ पदाधिकाऱ्यांना या बैठकीला बोलावलं असतं तर त्यांनी आपले विचार मांडले असते. आता या प्रकरणी परस्पर समिती नेमल्यामुळे जनतेत संशयकल्लोळ निर्माण होईल. त्यामुळे मी मुख्यमंत्र्यांना भेटून आमच्या भावना मांडण्याचा प्रयत्न करणार आहे, असं झिरवाळ यांनी सांगितलं.

<><><><><>

अनेक ठिकाणी आज ईद - ए - मिलाद - उन - नबी म्हणजेच प्रेषित मोहम्मद पैगंबरांची जयंती उत्साहात साजरी होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जनतेला त्यानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. प्रेषित मोहम्मद पैगंबरांनी प्रत्येकाला प्रेम आणि बंधुत्वाच्या भावनांना बळ देण्यासाठी प्रेरित केलं, त्यांनी समाजात दया, मानवतेचा प्रसार केला असं राष्ट्रपतींनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

प्रेषित हजरत मोहम्मदांची मानवता आणि बंधुभावाची शिकवण निरंतर जगाला मार्गदर्शन करीत राहील असं उपराष्ट्रपतींनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

या सणाच्या निमित्ताने सर्वत्र आनंद, समृद्धी, एकोपा आणि सामंजस्याचं दर्शन घडावं, अशी शुभेच्छा प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केली आहे.

राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी ईद ए मिलाद निमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. ईद ए मिलाद हा सण त्यांच्या प्रेम, दया आणि त्यागाच्या शिकवणीचे स्मरण करुन देतो, असं राज्यपालांनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

श्रोते हो, विविध देशात गणेशोत्सव कशा रीतीनं साजरा होतो हे आपण तिथे राहणाऱ्या नागरिकांकडून जाणून घेत आहोत. आकाशवाणी मुंबईवरून रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी प्रसारित होणाऱ्या राष्ट्रीय बातम्यामध्ये आज आपण जाणून घेणार आहोत, थायलंडमधल्या गणेशोत्सवाविषयी.

**<><><><><>**

राज्यभरात उद्या, अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणरायाला निरोप दिला जाणार आहे. यासाठी विविध ठिकाणी स्थानिक प्रशासन सज्ज झालं आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेनं यंदा पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशानं गणेशमूर्तींचं विसर्जन करण्यासाठी २०४ कृत्रिम तलाव तयार केले आहेत. या तलावांची माहिती भाविकांना क्यूआर कोडद्वारे मिळणार आहे. पुण्यात विसर्जन मिरवणुकीच्या अनुषंगानं वाहतुकीत बदल केले असून शहरातले महत्त्वाचे रस्ते वाहतुकीसाठी बंद ठेवले जाणार आहेत.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांनी शहरातल्या विविध विसर्जन विहिरी आणि कृत्रिम तलावांची पाहणी करून पूर्वतयारीचा आढावा घेतला. लातूर शहरातल्या विसर्जन मार्गावर वाहतूक बंद करुन पर्यायी मार्गाने वाहतूक वळवण्यात येणार आहे.

नांदेडमध्येही गणेशाचं पर्यावरणपूरक विसर्जन करण्यासाठी महापालिकेची यंत्रणा सज्ज आहे. शहरात दोन ठिकाणी कृत्रिम तलाव, तर २६ मूर्ती संकलन केंद्रं उभारण्यात आली आहेत.

जालना शहरात घरगुती गणेशमूर्तींचं पर्यावरणपूरक विसर्जन करण्यासाठी मोती तलाव चौपाटीवर कृत्रिम हौद तयार करण्यात आले आहेत, तर सार्वजनिक मंडळांच्या मोठ्या गणेशमूर्तींचं विसर्जन मोती तलावात होणार आहे.

धाराशिव जिल्ह्यात अनंत चतुर्दशीच्या दिवशी ९९९ गणेश मूर्तींचे विसर्जन होणार आहे. यासाठी जिल्हा पोलीस दलानं पुरेसा पोलीस बंदोबस्त तैनात केला आहे.

दरम्यान, हिंदू आणि मुस्लिम समुदायांमध्ये सामाजिक सलोखा कायम राखण्याच्या उद्देशानं मुंबई शहर, मुंबई उपनगर आणि राज्यातल्या इतर काही जिल्ह्यांमध्ये मुस्लिम बांधवांनी ईदचा जुलूस १८ तारखेला काढायचा निर्णय घेतला आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनानं ईद-ए-मिलादची सार्वजनिक सुट्टी १६ तारखेऐवजी १८ तारखेला जाहीर केली आहे.

**<><><><><>**

चीनमधल्या हुलनबीर इथं सुरु असलेल्या आशिया हॉकी स्पर्धेत आज झालेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात दक्षिण कोरियावर ४-१ अशी मात करत भारतीय संघानं अंतिम फेरीत धडक मारली आहे. हरमनप्रीत सिंगनं दोन, तर उत्तम सिंग आणि

जरमनप्रीत सिंग यांनी प्रत्येकी एक गोल करत भारताच्या आजच्या विजयात महत्वाची भूमिका बजावली. दक्षिण कोरियाचा संघ मात्र एकमेव गोल नोंदवू शकला.

भारतीय संघाचा अंतिम सामना उद्या यजमान चीनच्या संघाशी होणार आहे.

**<><><><><>**

मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त छत्रपती संभाजीनगर इथल्या सिद्धार्थ उद्यानात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते उद्या ध्वजारोहण होणार आहे.

**<><><><><>**

शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्याविषयी केलेलं वक्तव्य हिंसेला चिथावणी देणारं असल्यानं त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करुन कारवाई करावी, अशी मागणी विधानसभेतले विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर महायुती सरकारच्या पायाखालची वाळू सरकली असून, मानसिक संतुलन देखील ढळलं आहे, त्यामुळेच लोकसभेतल्या विरोधी पक्षनेत्याबाबत अशी भाषा ते वापरत आहेत. पण राज्यातली जनता हिंसक वृत्ती बाळगणाऱ्यांना योग्यवेळी धडा शिकवेल, असं वडेट्टीवार यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात कोकणात अनेक ठिकाणी, विदर्भात काही ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.